अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद,नवी दिल्ली व फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० पासून औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेमध्ये वाढ करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र.टीईएम-२०१९/प्र.क्र.१३०/तांशि-४
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ८ जुलै, २०१९.

<u>वाचा</u> :- १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.टीईएम-२०१९/प्र.क्र.१३०/ तांशि-४,दि. १०.०६.२०१९.
२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक २/ एनजीपी /मान्यता/२०१९/६४५, दि. १७.०६.२०१९.
३) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक २/ एनजीपी /मान्यता/२०१९/८३५, दि.०३.०७.२०१९.

शासन निर्णय :

संचालकांनी वर नमूद केलेल्या दि.१७/०६/२०१९ च्या पत्राव्दारे शासनास सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन वर नमूद दिनांक १०/६/२०१९ च्या शासन निर्णयाच्या Annexure “A” मधील अ.क्र.१४२ येथील दत्तकला कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे या संस्थेची Pharmaceutical Quality Assurance या अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता १२ इतकी ऐवजी १५ इतकी करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. संचालकांनी वर नमूद केलेल्या दि.०३/०७/२०१९ च्या पत्राव्दारे शासनास सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन वर नमूद दिनांक १०/६/२०१९ च्या शासन निर्णयासोबतच्या Annexure “A” मधील एमईटीचे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, नाशिक या संस्थेची अ.क्र. ८८ मधील फार्माकॉलॉजी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता “०” ऐवजी “६” इतकी करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

३. यासाठी दि.१०/०६/२०१९ च्या शासन निर्णयातील इतर अटी व शर्ती कायम राहतील.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०७०९११४६४१३५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY AUDUMBAR DHARURKAR

Digitally signed by SANJAY AUDUMBAR DHARURKAR
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=637145fd393d6d5c713e94e6da7bc6bee23011448b7fc64d138630b9c76ae7a2, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=fcf7172a73579b34fa622983d8fb647780fbef1d35a1ca975955eb9193f3f800, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SANJAY AUDUMBAR DHARURKAR
Date: 2019.07.09 17:03:30 +05'30'

(संजय औ.धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
३. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
४. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड
५. संबंधित संस्था (संचालक,तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
६. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.
७. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.
८. फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया, कम्बाईन्ड काऊन्सिल बिल्डींग, कोटला रोड, ऐवान-ए गालिब मार्ग, नवी दिल्ली -११०००२
९. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई.
१०. निवड नस्ती/तांशि-४